राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत नागपूर पेरी अर्बन १० गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेकरीता अतिरिक्त वितरण व्यवस्था मंजूर करणेबाबत

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः ग्रापापु-१११८/ प्र.क्र. १५५/पापु-१३
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई-४०० ०३२
तारीख: २१ मे, २०१८.

वाचा -

१) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापपु-२०१२/प्र.क्र. ७३/पापु-१३, दि. ३१/१/२०१४.
२) शासन पत्र क्रमांक सुप्रमा-१११४/प्र.क्र. २८१/पापु-१३, दि. ५/११/२१४.
३) मा.मंत्री (पा.पु.व स्व.) यांचे अध्यक्षतेखालील दिनांक २०/११/२०१७ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त
४) मुख्य अभियंता, म.जि.प्रा. प्रादेशिक विभाग, नागपूर यांचे क्र. मजीप्रा/मुअ(ना)/तांशा-२/९११/१८, दिनांक ७/५/२०१८ चे तांत्रिक मान्यता आदेश.
५) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, नागपूर यांचे क्र. मजीप्रा/मुअना/तांशा-२/२२/१८, दि. ७/५/२०१८ चे पत्र.
६) ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या त्रयस्थ तांत्रिक परिक्षणाबाबतचा शासन निर्णय ग्रापाधो-१११४/प्र.क्र.६१/पापु-०७,दि.१५/०६/२०१५ व दि.१४ मार्च, २०१६.

प्रस्तावना

नागपूर पेरी अर्बन १० गावे तसेच नागपूर सुधार प्रन्यास यांचे मागणीनुसार समाविष्ट गावे, ता. जि. नागपूर येथील प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेच्या रु. २३२७४.१९ लक्ष इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास संदर्भ क्र. १ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच संदर्भ क्रमांक २ येथील पत्रान्वये सदर योजनेच्या जादा दराच्या निविदांना मंजूरी देण्यात आली आहे.

नागपूर पेरी अर्बन योजनेत अंतर्भूत गावांची वाढ झपाटयाने होत असल्याने सर्व संबंधीत गावांच्या ग्रामपंचायतीनी वाढीव वितरण व्यवस्थेची मागणी केल्याने, याबाबत मा. मंत्री (पा.पु.व स्व.) यांचे अध्यक्षतेखाली मा.मंत्री (ऊर्जा व राज्य उत्पादन शुल्क) यांचेसमवेत दिनांक २०/१/२०१७ रोजी झालेल्या बैठकीत वाढीव वितरण व्यवस्थेबाबत स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

प्रस्तुत मूळ योजनेच्या अंदाजपत्रकानुसार रु. २३२.७४ कोटी इतक्या किंमतीची योजनेस मंजूरी देण्यात आली आहे. तथापि, सदर योजनेवर अतिरिक्त बाब वगळून रु. २०६.८५ कोटी इतका खर्च होणार आहे. त्यामुळे योजनेवर रु. २५.८८ कोटी इतकी बचत होत आहे. त्यातून, समाविष्ट गावातील अतिरिक्त वितरण व्यवस्थेवरील कामाचा खर्च करणे शक्य असल्याने, सदर योजनेतील समाविष्ट गावांचे सर्वेक्षण करुन अतिरिक्त वितरण व्यवस्थेचे रु. ८,५१,१९,४६०/- (ढोबळ) इतक्या किंमतीचे अंदाजपत्रकास संदर्भ क्र.४ अन्वये मुख्य अभियंता, म.जि.प्रा. प्रादेशिक विभाग, नागपूर यांनी तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे.

त्यानुषंगाने, मुख्य अभियंता, म.जि.प्रा. प्रादेशिक विभाग, नागपूर यांनी संदर्भ क्र. ५ अन्वये राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत नागपूर पेरी अर्बन व १० प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेकरीता अतिरिक्त वितरण व्यवस्थेचे अंदाजपत्रक मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला आहे.

शासन निर्णय

नागपूर पेरी अर्बन १० गावे तसेच नागपूर सुधार प्रन्यास यांचे मागणीनुसार समाविष्ट गावे, ता. जि. नागपूर या प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेच्या मूळ मंजूर योजनेतील बचतीतून, योजनेतील समाविष्ट गावांचे अतिरिक्त वितरण व्यवस्थेकरीता रु. ८,५१,१९,४६०/- (ढोबळ) (**अक्षरी आठ कोटी एक्कावन्न लक्ष एकोणीस हजार चारशे साठ फक्त**) एवढ्या इतक्या किंमतीचे अंदाजपत्रकास पुढील अटींच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

अटी

१) प्रस्तुत कामाच्या स्वतंत्र निविदा काढण्यात याव्यात. प्रस्तुत कामाच्या विहीत पद्धतीने ई-निविदा मागविण्यात याव्यात. योजनेच्या जादा किंमतीच्या निविदा स्विकृत करु नयेत.

२) प्रस्तावित कामाकरीता होणारा खर्च मंजूर योजनेच्या बचतीतूनच करण्यात यावा.

३) प्रस्तावित कामे करताना काही तांत्रिक बदल झाल्यास शासनाची मंजूरी घेण्यात यावी.

४) राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून व इतर सर्व परवानग्या प्राप्त झाल्याशिवाय सदर कामाच्या निविदा मागविण्यात येऊ नयेत.

५) प्रस्तावित योजनेच्या अतिरिक्त कामांना दिलेल्या तांत्रिक मंजूरी आदेश बाब क्र. १३४, माहे मे, २०१८ मधील अटींचे काटेकोरपणे पालन करावे.

६) दिनांक १५ जून, २०१५ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार सदर वाढीव कामासाठी त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करणे आवश्यक राहील.

७) प्रस्तावित कामाच्या अंमलबजावणीमध्ये कोणत्याही स्वरुपाची अनियमितता, अपहार अथवा गैरव्यवहाराच्या बाबी निदर्शनास आल्यास अनियमिततेस जाबबदार संबंधीत अधिकारी/ कर्मचारी शिस्तभंगाची कारवाईस पात्र राहतील.

२. प्रस्तुत कामांवर होणारा खर्च जिल्हा परिषदेला प्राप्त होणाऱ्या राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत केंद्र तथा राज्य निधीतून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५२११५०२१९७६२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suresh D. Ambekar

Digitally signed by Suresh D. Ambekar
DN: CN = Suresh D. Ambekar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = WSSD
Date: 2018.05.21 16:10:34 +05'30'

(सु.दे.आंबेकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

मा. **प्रत,**

१) मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.
२) मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
३) मा.विधानमंडळ सदस्य (सर्व)
४) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
५) जिल्हाधिकारी, नागपूर.
६) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर.
७) महालेखापाल, लेखा परिक्षा, महाराष्ट्र-२, नागपूर.
८) महालेखापाल, लेखापरीक्षा, महाराष्ट्र १, मुंबई
९) संचालक, पाणी व स्वच्छता सहाय संस्था(वासो), बेलापूर, नवी मुंबई.
१०) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नागपूर.
११) अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नागपूर.
१२) संचालक(वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, बेलापूर,नवी मुंबई.

१३) उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, नागपूर
१४) वरिष्ट भुवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, नागपूर.
१५) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, नागपूर.
१६) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, नागपूर.
१७) अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१८) मु.अ. तथा वि.का.अ. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१९) कार्यासने (पापु-०४, ०६,०७,०९,१०,१७,१८, १९ व २०), पा. पु. व स्व. वि.,मंत्रालय,मुंबई-३२.
२०) निवडनस्ती कार्यासन पापु-१३.